# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## झुलेलाल टॉवर, उल्हासनगर–५ या अतिधोकादायक इमारतीचे निष्कासन



उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कॅम्प नं. ५ येथे झुलेलाल टॉवर ही इमारत अतिधोकादायक इमारत म्हणून घोषित करण्यात आली होती. सदर इमारतीचे बांधकाम सुमारे २० वर्षांपूर्वी करण्यात आले होते. सदर इमारतीचे स्वरुप तळमजला+५ मजले असे असून त्यात एकूण २५ सदनिका होत्या. सदर इमारत अतिधोकादायक असल्याने यापूर्वीच महापालिकेतर्फे पूर्णपणे रिकामी करण्यात आली होती. सदर इमारतीच्या आजुबाजूला जिन्सचे व बर्नरचे कारखाने असून त्यात अहोरात्र काम सुरु असल्याचे निदर्शनास आले होते. पावसाळयाच्या कालावधीत सदर इमारत कोसळून मोठया प्रमाणावर जिवीत व वित्त हानी होण्याची दाट शक्यता होती. यामुळे सदर इमारत अत्याधुनिक यंत्रसामुग्री वापरुन दिनांक २९/६/२०१५ ते ५/७/२०१५ या कालावधीत सदर पाच मजली इमारतीचे महापालिकेमार्फत पूर्णपणे निष्कासन करण्यात आले आहे.